प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

**DEPARTMENT OF COMMUNICATION**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

डिसेंबर ५, २०१२

**आरबीआयक्युच्या राष्ट्रीय अंतिम फेरीत तिरुअनंतपुरमची शाळा विजयी**

छायाचित्र

चिन्मय विद्यालय एचएसएस, तिरुअनंतपुरमचे मास्टर सुर्या गिरीश व मास्टर एम. जॉय हे दोघे, भारतीय रिझर्व बँकेने आयोजित केलेल्या अखिल भारतीय आंतर शालेय क्विझचे - आरबीआयक्युचे विजेते ठरले. गुवाहाटीच्या महाऋषि विद्यामंदित पब्लिक स्कूलचे मास्टर तन्मय काकाटी व मास्टर श्रेयस सरकार हे उपविजेते ठरले. आरबीआयक्युची अंतिम स्पर्धा, नॅशनल लायब्ररी, कोलकाता येथे आज घेण्यात आली होती.

आरबीआयक्यु हा, वित्तीय बाबीसंबंधाने जाणीव प्रसारित करण्याचा विशेषतः लहान मुलांमध्ये रिझर्व बँकेचा आणखी एक प्रयत्न आहे त्यामुळे ती मुले भविष्यात स्वतःच वित्तीय दृष्ट्या जबाबदार असे नागरिक होतील आणि वयाने मोठ्या असलेल्यांना, बचत, बँकिंग व इतर वित्तीय बाबींची सवय लावण्यास प्रवृत्त करतील.

विजेत्यांना बक्षिसे देतेवेळी, भारतीय रिझर्व गव्हर्नर, डॉ. डी सुब्बाराव म्हणाले की, बँकिंग, वित्त आणि भारत ह्या संबंधीच्या प्रश्नांची उत्तरे देताना ह्या सहभागींनी प्रदर्शित केलेली माहिती व ज्ञान ह्यांच्या व्याप्तीमुळे ते दिपून गेले आहेत गव्हर्नर असेही म्हणाले की, जयपुर ते विशाखापट्ट्ण, इंफाळ ते वडोदरा, कोची ते डेहराडुन, जम्मू ते पाटणा - सर्व देशभरातच आरबीआयक्युमुळे निर्माण झालेला उत्साह व उत्तेजना पाहून त्यांना खूप आनंद झाला.

ह्या प्रसंगी, रिझर्व बँकेचे डेप्युटी गव्हर्नर्स, व कार्यकारी संचालक, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील काही बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारीही उपस्थित होते.

रिझर्व बँकेने, हा आरबीआयक्युचा कार्यक्रम, ह्यावर्षी, ९ वी, १० वी, ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु केला होता. देशभरातील सर्व शाळा व बोर्डांनी ह्यात भाग घेतला होता. देशभरातील ३२ केंद्रांमध्ये तीन महिने आरबीआयक्यु ठेवण्यात आला. ३००० शाळांना आमंत्रित केले होते व १६०० शाळांनी त्यात भाग घेतला होता. राज्यांच्या राजधान्यांमध्ये प्रादेशिक अंतिम स्पर्धा घेतल्या गेल्यानंतर, उपांत्य फेरी व अंतिम फेरी कोलकता येथे घेण्यात आली. आरबीआयक्युचे संचालन, सुप्रसिध्द क्विझ मास्टर, श्री बॅरी ओब्रायन ह्यांनी केले. आरबीआयक्युच्या उपांत्य व अंतिम फे-या, डिसेंबर १५, २०१२ ते जानेवारी १५, २०१३ दरम्यान झी बिझनेस वाहिनीवर दाखविल्या जातील.

**अजित प्रसाद**

सहाय्यक महाव्यवस्थापक.

**वृत्तपत्रांसाठी निवेदन २०१२-२०१३/९४४**